# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १०/०२/२०२२ (गुरूवार)**

**(सकाळ)**

---

## चोरी

**१) पो.स्टे. बोरी** :— अंतर्गत मौजा प्रभाग क्र ३ बुटीबोरी येथे दिनांक ०५/०२/२०२२ चे १०.०० वा. ते १४.०० दरम्यान आरोपी नामे— विनोद दाखणकर, रा. बुटीबोरी वार्ड क्र. ४ याने फिर्यादी नामे— मोरेश्वर महादेव वांढरे वय ५० वर्ष, रा. क्रांती चौक प्रभाग क्र ३, बुटीबोरी यांचे घरातील रॅकमधील डायरीमध्ये ठेवलेले एटीएम कार्ड हे उघडया घरातुन चोरून व त्यादवारे एटीएम व्दारे दि. ०५/०२/२०२२ रोजी २५,०००/—रू. व दि ०६/०२/२०२२ रोजी १०,०००/—रू. असा एकुण ३५,०००/—रुपय काढुन चोरी केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार नांदुरकर हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कोंढाळी** :— अंतर्गत १७ कि. मी. अंतरावरील मौजा बाजारगाव ते पांजरा रोड शिवार येथे दिनांक ०८/०२/२०२२ चे १२.०० वा. ते दिनांक ०८/०२/२०२२ चे रात्री ०१.०० वा. दरम्यान इंडस मोबाईल टावर निर्मित मौजा बाजारगाव ते पांजरा रोड शिवारात लागुन असलेल्या मोबाईल टावर ला विदयुत पुरवठा करण्यासाठी लावण्यात आलेला अमर राजा कंपनीच्या २४ बॅटऱ्या व २० मीटर पावर केबल असा एकुण किंमती २०,०००/—रू. रुपयाचा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— आशिष नरसिंहराव खंडागळे, वय ३३ वर्ष रा. श्रीकृष्ण अपार्टमेंट प्लॉट ने २०२ अंबाझारी लेआउट नागपुर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक किशोर लोही मो.नं ९१४६४२२६३३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**